अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम १९९५ नुसार विभागातील वर्ग १ ते वर्ग ४ च्या पदावर शारिरीक दृष्टया अपंगांसाठी आरक्षण ठेवणे/सूट देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**

कृषि,पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक-कृषिआ-१२०४/प्र.क्र.३८७(१)/१६-अे,
मंत्रालय विस्तार,मुंबई ४०००३२.
दिनांक- २४ जानेवारी, २०११

**वाचा**:- १) अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्काचे संरक्षण) अधिनियम, १९९५
२) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक-आकृवि-१२९८/प्र.क्र.२८/१५-अे, दिनांक १४ मे,१९९७.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०९७/ प्र.क्र.१२/९७/१६अे, दिनांक २/०५/१९९८
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- एसआरव्ही-१०९९/ प्र.क्र.३७/१६अे, दि. ४/०३/२००२
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- अपंग-१००१/६१/ प्र.क्र.३६/२००२/१६अे,दिनांक १०/०५/२००२
६) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक- अपंग-२००२/प्र.क्र.२०४/सुधार-३ दिनांक ५/०८/२००२
७) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक- अपंग-१००३/प्र.क्र.१२७/१६अे, दिनांक ६/०५/२००४
८) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक-कृषिआ-१२०४/प्र.क्र.३८७/१६-अे, दि. ३/१२/०४
९) शासन पत्र , सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, क्र. अपंग-२००७/प्रक्र-७४/सुधार-३,दि.१६ जून, २००८
१०) शासन पत्र , सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग, क्र. न्यायाप्र-२००६/प्रक्र-९/सुधार-३,दि.११/०२/०९
११) शासन निर्णय, कृषि व पदुम विभाग, क्रमांक कृषिआ-१२०४/प्रक्र-३८७/१६अे,दि.१६ फेब्रुवारी, २००९
१२) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय विभाग क्र. न्यायाप्र-२००९/प्रक्र-५/सुधार-३. दि. ०३/०८/२०१०

**<u>प्रस्तावना -</u>**

अपंग व्यक्ती ( समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ च्या कायद्यान्वये अपंगांच्या सर्वांगीण विकासासाठी व त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी शासकीय व निमशासकीय सेवेत अपंग व्यक्तीसाठी ३% पदे आरक्षित करण्याची तरतुद आहे. त्यासाठी अपंग व्यक्तींकरीता पदनिश्चित करण्यात येते. त्याअनुषंगाने पुनर्रचित तज्ञ समितीच्या दिनांक २६/०९/२००६ रोजी सचिव, सामाजिक न्याय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकी सुधारणा केल्याप्रमाणे संदर्भ क्र. ८ येथील शासन निर्णय अधिक्रमीत करुन संदर्भ क्र. ११ येथील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला होता. आता केंद्र शासनाने अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतुदीस अनुसरुन त्यांच्या अखत्यारीतील आस्थापनेवरील अपंग व्यक्तींसाठी पदे निश्चित केली असून त्याची यादी प्रसिध्द केलेली आहे. त्यास अनुसरुन आवश्यक ती कार्यवाही करणेबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाने संदर्भ क्र. १२ येथील दि. ०३/०८/२०१० च्या शासन निर्णयान्वये सूचना दिल्या होत्या. उपरोक्त सूचनांच्या अनुषंगाने आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय स्तरावर कार्यरत असलेली पदे केंद्र शासनाच्या यादीतील समान पदांप्रमाणे अपंगांसाठी सुनिश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय -</u>**

आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयातील सर्व संवर्गातील पदांची कर्तव्ये, जबाबदाऱ्या व कामाचे स्वरुप विचारात घेऊन व सर्व पदांचा आढावा घेऊन व डॉ.लहाने, ग्रँट मेडिकल कॉलेज, मुंबई, सदस्य यांच्या तज्ञ समितीने केलेल्या शिफारशीनुसार निर्गमित करण्यात आलेला उपरोक्त संदर्भ क्र. ११ येथील दि. १६ फेब्रुवारी, २००९ चा शासन निर्णय याद्वारे अधिक्रमीत करण्यात येत आहे.

३. केंद्र शासनाने त्यांच्या अधिपत्याखालील आस्थापनेवरील जी पदे अपंग व्यक्ती (समान संधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम १९९५ मधील तरतुदीनुसार ज्या यादीन्वये सुनिश्चित केलेली आहेत त्या यादीतील आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखालील क्षेत्रीय स्तरावर सद्य कार्यरत गट-अ,ब,क व ड संवर्गातील सरळ सेवेने भरावयाची तुलनात्मक समान पदे सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद केल्यानुसार अपंगांसाठी सुनिश्चित करण्यात येत आहे.

२. अपंगव्यक्ती (समानसंधी, संपूर्ण सहभाग व हक्कांचे संरक्षण) अधिनियम, १९९५ या अधिनियमातील कलम ३२ व ३३ अनुसार कृषि आयुक्तालयांतर्गत गट-अ ब क व ड मधील विविध संवर्गातील पदांवरील सरळसेवा भरतीमध्ये किमान ४०% अंध/अल्पदृष्टी, कर्णबधीर व अस्थिव्यंग या प्रवर्गातील अपंग व्यक्तींसाठी प्रत्येकी १% याप्रमाणे ३% आरक्षण लागू राहील. तसेच गट-क व गट-ड मध्ये सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०५/०३/२००२ च्या शासन निर्णयाप्रमाणे पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू राहील

७. हे आदेश सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या संदर्भ क्र.१२ येथील शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहेत.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०११०१२४२०५७१६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**(सुनिल हंजे)**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,

मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (कृषि ) यांचे खाजगी सचिव
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई ( पत्राने अग्रेषित )
आयुक्त कृषि , कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे.
महालेखापाल-१/२ महाराष्ट्र (लेखा परिक्षा/लेखा अनुज्ञेयता) मुंबई/नागपूर
सर्व विभागीय आयुक्त
सर्व विभागीय कृषि सहसंचालक.
सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी /सर्व जिल्हा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
सर्व कोषागार अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई
सर्व सहसचिव /उप सचिव / अवर सचिव/ कक्ष अधिकारी , कृषि व पदुम विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
निवडनस्ती /१६अे

## कृषि व पदुम विभाग, शासन निर्णय क्र. कृषिआ-१२०४/प्रक्र-३८७(१)/१६ए, दि.२४/०१/२०११ सोबतचे परिशिष्ट-अ

## केंद्र शासनाने अपंग आरक्षणासाठी निश्चित केलेल्या यादीतील पदांना तुलनात्मक समान असलेली कृषि आयुक्तालयांतर्गत सुनिश्चित केलेली पदे

| अ.क्र | संवर्ग | कामाचे स्वरुप व शारिरिक योग्यता | सुयोग्य पदासाठी अपंगत्वाचा प्रकार | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **गट-अ** | | | | |
| १ | आयुक्त कृषि | S.C.W.SE.RW.ST | OL.OA.B.LV.HH | भारतीय प्रशासन सेवेतील पद |
| २ | संचालक | S.C.W.SE.RW.ST | OL.OA.B.LV.HH | पदोन्नतीचे पद असल्याने आरक्षण नाही |
| ३ | कृषि सह संचालक | S.ST.W.RW.C.MF.SE | OL.BL.OA.OAL.B.LV.HH | पदोन्नतीचे पद असल्याने आरक्षण नाही |
| ४ | कृषि सहसंचालक (आस्था) | S.ST.W.RW.C.MF.SE | OL.BL.OA.OAL.B.LV.HH | पदोन्नतीचे व एकाकी पद असल्याने आरक्षण नाही |
| ५ | अधिक्षक कृषि अधिकारी वर्ग-१ | S.ST.W.RW.C.MF.SE | OL.BL.OA.OAL.B.LV.HH | पदोन्नतीचे पद असल्याने आरक्षण नाही |
| ६ | **कृषि उपसंचालक मंकृसे गट-अ**<br>उप विभागीय कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, बीज परिक्षण अधिकारी, सांख्यिकी वर्ग-१, | ST.W.BN.SE.MF.S.C.RW.KC | OA.OL.HH | सरळसेवा |
| ७ | वरिष्ठ प्रशासन अधिकारी | S.C.W.SE.RW.ST | OL.OA.B.LV.HH | पदोन्नतीचे व एकाकी पद असल्याने आरक्षण नाही |
| ८ | सामान्य राज्य सेवा वर्ग-१<br>( प्रशासन अधिकारी ) | S.C.RW.ST | OL.BL.OA.HH.B.LV | **सरळसेवा** |
| ९ | सहाय्यक संचालक लेखा | | **वित्त विभागाकडून निश्चित करण्यात आलेले आरक्षण** | **प्रतिनियुक्तीची पदे** |
| **गट-ब** | | | | |
| १० | महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब<br>तालुका कृषि अधिकारी, तंत्र अधिकारी,कृषि अधिकारी, सांख्यिकी वर्ग-२, मोहिम अधिकारी, जिकृअ, जिल्हा मृद चाचणी मृद सर्वेक्षण अधिकारी, रसायण शास्त्रज्ञ, | S.ST.W.BN.H.C.KC.RW.S.H.SE | OA.HH | सरळसेवा |
| ११ | सामान्य राज्य सेवा वर्ग-२<br>( सहाय्यक प्रशासन अधिकारी) | S.RW.SE.MW.C. | OL.OA.BL.HH.B.LV | सरळसेवा |
| १२ | लेखा अधिकारी | | **वित्त विभागाकडून निश्चित करण्यात आलेले आरक्षण** | **प्रतिनियुक्तीची पदे** |
| १४ | स्विय सहाय्यक | S.ST.BN.MF.RW | OL.BL.OA.B.LV | पदोन्नतीची पदे |
| **गट-क** | | | | |
| १५ | कृषि अभियंता /कनिष्ट अभियंता | S.ST.W.BN.MF.SE.RW.C | OA.OL.BL.HH | सरळसेवा |
| १६ | अधिक्षक | S.RW.SE.MW.C. | OL.OA.BL.HH.B.LV | पदोन्नतीची पदे |
| १७ | लघुलेखक (उच्चश्रेणी) | S.ST.BN.MF.RW | OL.BL.OA.B.LV | सरळसेवा व पदोन्नती |
| १८ | लघुलेखक (निम्नश्रेणी) | S.ST.W.L.MF.SE.RW.H.C. | OA.OL,BL.OAL.B.LV | सरळसेवा व पदोन्नती |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १९ | लघुटंकलेखक | S.ST.W.L.MF.SE.RW.H.C. | OA.OL,BL.OAL.B.LV | सरळसेवा व पदोन्नती |
| २० | सहाय्यक अधिक्षक | S.ST.W.SE.RW.H.C. | OA.OL.BL.OAL.B.LV.HH | सरळसेवा व पदोन्नती |
| २१ | वरिष्ठ लिपीक | S.ST.W.RW.H.C. | OA.OL.BLO.OAL.B.LV.HH | सरळसेवा व पदोन्नती |
| २२ | लिपीक | S.ST.W.MF.SE.RW.H. | OA.OL.OAL.BL.B.LV.HH | सरळसेवा व पदोन्नती |
| २३ | कृषि पर्यवेक्षक | S.ST.W.BN.H.C.KC.RW.S.H.SE | OA.HH | सरळसेवा व पदोन्नती |
| २४ | कृषि सहाय्यक | ST.W.L.BN.MF | OL.BL.LV.HH | सरळसेवा व पदोन्नती |
| २५ | आरेखक | S.ST.W.BN.MF.SE.RW.C. | OA.OL.BL.HH | सरळसेवा व पदोन्नती |
| २६ | अनुरेखक | S.ST.W.BN.PP.MF.SE.RW | OL.BL.LV | सरळसेवा ( मृत संवर्ग ) |
| २७ | मशीनमन | S.ST.W.MF.SE.RW.H. | OL.LV.HH | एकाकी पद असल्याने आरक्षण नाही |
| २८ | सहाय्यक ग्रंथपाल | S.ST.W.SE.RW.H | OA.OL.OAL.BL.HH | एकाकी पद असल्याने आरक्षण नाही |
| २९ | वाहन चालक | -- | -- | सदर पदास आरक्षण नाही |
| **गट-ड** | | | | |
| ३० | नाईक | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE | OL.HH.LV/B | पदोन्नतीचे पद |
| ३१ | शिपाई | S.ST.W.F.PP.L.KC.B.SE | OL.HH.LV/B | सरळसेवा |
| ३२ | माळी | BN.KC.MF.SE | OL.LV.HH | सरळसेवा |
| ३३ | प्रथम श्रेणी मजूर | S.ST.W.F.PP.L.KCB.SE.H.RW | OL.HH.LV | कंत्राटी पध्दतीने भरती |
| ३४ | स्वच्छक | S.ST.W.KC.F.PP.L.SE | OL.HH.LV | सरळसेवा |
| ३५ | टिलर ऑपरेटर | S.ST.BN.L.KC.SE | OL.LV.HH | सरळसेवा |
| ३६ | प्रयोगशाळा सहाय्यक /परिचर | S.ST.W.F.PP.L.KCB.SE.H.RW | OL.HH.LV | सरळसेवा |

Abbreviations : OL= One Leg, OA= One Arm, OAL=One Arm and One Leg, B=Blind,
LV= Low Vision, BL=Both legs, HH= Hearing Handicapped, OH Orth. Handicapped
CP=Cerebral Palsy, LC= Leprosy Cured, VH= Visually Handicapped,

S=Sitting, BN=Bending, SE= Seeing, RW= Reading & Writing, C= Communication,
MF= Manipulation by Fingers, PP= Pulling & Pushing, L=Lifting, KC= Kneeting & Croutching,
ST= Standing[ W=Walking, MW Muscular Weakness